ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २३ नोव्हेंबर, १९६० | अंक ४२

**कठिण समय येता कोण कामास येतो ?**

खरं पाहिलं तर कोणीच कोणाच्या कामास येत नाहीं. म्हातारपणीं तर याचा अनुभव फार येतो, परंतु अशावेळीं आपलं स्वतंत्र उत्पन्न असेल तर मात्र कोणावर भार न टाकतां सुखानें जीवन चालवितां येईल. त्याकरितां आतांच आयुर्विमा उतरविणं आवश्यक आहे. आणि हें किती सहज शक्य आहे पहा.

उदा. ह्या वर्षात ५ गाड्या ऊंस कमी आला अथवा ४ पोती धान्य हाती आलं नाहीं असं समजून ते पैसे आयुर्विम्यांत गुंतविले तर उतारवयांतील उत्पन्नाची काळजी राहणार नाहीं.

लाइफ इन्शुरन्स कार्पोरेशन दरवर्षी हक्कपूर्तीचे म्हणून जे २८ कोटी रुपये विमेदारांना देते त्यापैकीं २१ कोटी रुपये विमेदारांना त्यांच्या हयातीतच मिळतात. म्हणून आजच विमा एजंटाची गांठ घ्या. तो तुम्हांला योग्य अशी विमा योजना सुचवील.




**आयुर्विम्याला
दुसरा पर्याय नाहीं.**

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

# विविध माहिती

**कुटुंबनियोजनाचीं अधिक केंद्रें**—गुजरात राज्याच्या १७ जिल्ह्यांत कुटुंबनियोजनासंबंधीं एक एक केंद्र उघडण्याचा राज्य सरकार विचार करीत आहे. ह्या केंद्रांतून पुरुषांवरील शस्त्रक्रियेची सोय करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत ४ लाख पुरुषांवर अशा प्रकारच्या निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रिया होतील असा अंदाज आहे.

**रूरकेलासाठी पाण्याचा पुरवठा**— रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्याजवळ कारखान्याशीं संबंधित असलेल्या लोकांचें एक मोठें शहरच निर्माण झालें आहे. ह्या नव्या शहराला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ओरिसा सरकार एक योजना तयार करीत आहे. संकल्पित योजनेला ६० लाख रुपये खर्च येणार आहे.

**हिंदी शेतकऱ्यांचा अभ्यास-दौरा**—युरोपमधील शेतीच्या पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी २० हिंदी शेतकऱ्यांची एक तुकडी पुढील वर्षी युरोपला पाठविण्यांत येणार आहे. प्रत्येक हिंदी शेतकरी कोठल्या तरी शेतावर ६ ते १२ महिने राहून शेतीच्या पद्धतींचा अभ्यास करील. युरोपांतील अशीच एक तुकडी भारतांत येण्याचें घाटत आहे.

**अहमदाबादची लोकसंख्या**—अहमदाबाद शहराची एकूण लोकसंख्या ११,२९,५०८ आहे. पुरुषांची संख्या ६,१५,०८६ असून स्त्रियांची ५,१४,६२२ आहे. शहरांतील कामगार आपआपल्या बायका खेड्यांतूनच ठेवत असल्यामुळें वरील तफावत पडली असावी. तटाच्या आंतील शहरांत राहणाऱ्या नागरिकांची संख्या ४,५६,६८८ आहे.

**मुलांची मुलांना मदत**—स्टॉकहोममधील शाळकरी मुलांनीं गुजरातमधील एका खेड्यांत शाळेची इमारत बांधण्यासाठी मदत म्हणून रु. ५,००० पाठविले आहेत. स्वीडनमध्यें गेलेल्या एका भारतीय प्रवाशाकडून शिक्षण घेण्याबाबत असणाऱ्या अडचणी त्यांना समजल्या. तेव्हां त्यांनीं आपल्या खाऊच्या पैशांतून व खास कार्यक्रम करून हे पैसे जमविले.

**पडीक जमिनीचा उपयोग**—भारतामधील लागवडी नसलेल्या पडीक जमिनीची पाहणी करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीनें पंजाब व पश्चिम बंगालसंबंधीं आपला अहवाल सादर केला आहे. बंगालमध्यें अशा प्रकारची १,१३,६४० एकर जमीन असून ती लागवडीस योग्य करण्यासाठी १·३२ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज कमिटीनें केला आहे.

**कलकत्ता वाचनालयाला देणगी**— कलकत्ता राष्ट्रीय वाचनालयाला एका दिवंगत तामीळ प्राध्यापकानें आपला सर्व ग्रंथसंग्रह देणगी म्हणून दिला आहे हस्तलिखितें व पुस्तकें मिळून ३ हजार ग्रंथ वाचनालयाला मिळाले. त्यांपैकी २६५ हस्तलिखितें भूर्जपत्रावर आहेत. १,५४३ इंग्रजी ग्रंथ आहेत.

**अरब देश तांदूळ पुरविण्यास तयार**—संयुक्त अरब प्रजासत्ताकाचें सरकार भारताला तांदूळ पुरविण्यास तयार आहे. ह्यापूर्वी भारतानें ह्या प्रजासत्ताकाकडून १ लाख मण तांदूळ विकत घेतला असून त्याच्या मोबदल्यांत चहा, ताग, सुती कापड, एंजिनिअरिंगचा माल, इत्यादि वस्तू पुरविल्या आहेत.

**बालभवनासाठी इमारत**—सौराष्ट्र बालहित संवर्धक मंडळानें राजकोटपासून ३० मैलांवर असलेल्या गोंडल ह्या गांवीं बालभवन उभारण्याचें ठरविलें आहे. इमारतीसाठी १ लाख रु. खर्च येणार आहे. त्यांपैकीं ५०,००० रु. गुजरात सरकार देणार असून १०,००० रु. गोंडल नगरपालिका देणार आहे.

**अफूची किंमत उतरविली**—अफूसेवन करणाऱ्या बिहार राज्यांतील लोकांपैकी ७२,००० जणांचीं नांवें नव्यानें केलेल्या तपासणींत आढळून आलीं नाहींत. हे लोक बहुधा काळ्या बाजारांत अफूची खरेदी करीत असावेत व त्यामुळें अफूची किंमत वाढली असावी असा सरकारचा अंदाज आहे. सरकारनें अफूची किंमत आतां तोळ्यामागें ४ रु. नीं कमी केली आहे.

**सिलोनचा पोलादाचा कारखाना**—रशिआच्या मदतीनें सीलोनमध्यें एक पोलादाचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. त्याचा अहवाल आतां सीलोनच्या सरकारकडे आला आहे. संकल्पित कारखान्याची उत्पादनक्षमता भिलई येथील कारखान्यांच्या एकदशांश असेल. एवढ्या उत्पादनक्षमतेनें सीलोनच्या सर्व गरजा भागण्यासारख्या आहेत.

**मध्यप्रदेशाला विजेचा पुरवठा**—ओरिसा सरकारनें मध्यप्रदेशाला हिराकुद योजनेपासून उत्पन्न होणाऱ्या विजेपैकी कांहीं वीज पुरविण्याचें कबूल केलें आहे. प्रथम हा पुरवठा अल्प प्रमाणांत करण्यांत येईल व १९६३ च्या अखेरीपर्यंत तो ५,००० किलोवॅटपर्यंत वाढविण्यांत येईल. हिराकुद धरण महानदीवर बांधण्यांत आलें आहे. तिचा उगम मध्यप्रदेशांत आहे.

**पाकिस्तानांत दशमान पद्धतीचीं नाणीं**—पुढील वर्षाच्या प्रारंभापासून पाकिस्तानांत दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू करण्यांत येणार आहेत. हीं नाणीं १ पैसा, ५ पैसे, १० पैसे, २५ पैसे ५० पैसे व १०० पैसे (एक रुपया) अशीं असतील. तथापि सध्यां चालू असलेलीं नाणीं पाकिस्तानांत तीन वर्षेपर्यंत कायदेशीर चलन म्हणून व्यवहारांत राहतील.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

THE DECCAN INSTITUTE OF COMMERCE.

*717, Budhwar Peth, Poona 2.* *Phone No. 2360*

**BANKERS PRACTICAL TRAINING COURSE.**

Admission to Bank-employees and Persons desirous of taking up Banking Career.

Duration—3 months. Time—7 to 8 p.m. Fees — Rs. 45 only. Limited admission.

Date of Commencement :— 1st December 1960.

# अर्थ

बुधवार, ता. २३ नोव्हेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## छोट्या उद्योगधंद्यांना साह्य करण्याची सूचना

बिहार चेंबर ऑफ कॉमर्सनें पाटणा येथें छोट्या उद्योगधंद्या-संबंधी तीन दिवसांचा एक परिसंवाद भरविला होता. बिहारचे मुख्य प्रधान डॉ. श्रीकृष्ण सिन्हा ह्यांनीं परिसंवादाचें उद्‌घाटन केलें. ह्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले कीं मोठ्या उद्योगधंद्यांनीं छोट्या उद्योगधंद्यांना सर्वतोपरी साह्य केलें पाहिजे. भांडवल, तांत्रिक ज्ञान, मार्गदर्शन, इत्यादि अनेक मार्गांनी असें साह्य मोठ्या उद्योगधंद्यांना देता येईल. भारतासारख्या अपुरा विकास झालेल्या देशांत छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीला विशेष महत्त्वाचें स्थान आहे. अपुरा विकास झालेल्या देशांना औद्योगिक भरभराटीसाठी लागणारें भांडवल अपुरें पडतें. त्यामुळें अधिक धन उत्पन्न करण्यासाठी त्यांना छोट्या उद्योगधंद्यांचाच अधिक उपयोग होतो. कोणत्याहि देशाचा विकास समतोलपणें करावयाचा झाल्यास त्यामधील शेती व उद्योगधंदे ह्या दोन्हींची वाढ प्रमाणशीर झाली पाहिजे. इंग्लंड व अमेरिका ह्यासारख्या पुढारलेल्या देशांतून सुद्धा बडे उद्योगधंदे व छोटे उद्योगधंदे एकाच वेळीं भरभराटलेले दिसतात. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची छाननी केली तर असें आढळून येईल कीं मोठ्या उद्योगधंद्यांनी उत्पन्न केलेल्या धनापेक्षा छोट्या उद्योगधंद्यांनी उत्पन्न केलेले धन दुप्पट आहे. शिवाय छोट्या उद्योगधंद्यांच्या मानानें मोठ्या उद्योगधंद्यांत अधिक रोजगार मिळण्याची शक्यता कमी असते. रोजगारीच्या क्षेत्राची व्याप्ति वाढत जाणें ही विकसन पावणाऱ्या अर्थव्यवस्थेची महत्त्वाची खूण मानली जाते. त्यासाठी छोट्या उद्योगधंद्यांचें आधुनिकीकरण मात्र करावयास पाहिजे.

---

## तेलाच्या किंमती कमी करण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न

पेट्रोल आणि तज्जन्य पदार्थ ह्यांचा पाकिस्तानला होणारा पुरवठा पश्चिम युरोपांतील कंपन्यांकडून केला जातो. विदेशी कंपन्यांकडून मिळणाऱ्या ह्या तेलाच्या किंमती कमी करण्यांत याव्या म्हणून पाकिस्तान सरकारनें कंपन्यांकडे बोलणीं सुरू केलेलीं आहेत. पाकिस्तानचें सरकार ह्या बाबतींत थोडेसें दडपणहि आणीत आहे. तेलपुरवठा कंपन्यांनी गेल्या जुलै महिन्यांत तेलाच्या किंमतींत ७ टक्के कपात जाहीर केलेली आहे. परंतु पाकिस्तान सरकारचें तेवढ्यानें समाधान झालेलें नाहीं. सरकारच्या मतानें कंपन्यांनीं आपल्या किंमतींत २१ टक्के कपात करणें आवश्यक आहे. पाकिस्तानांत खनिज तेलाचा शोध करण्यासाठी रशिआने तांत्रिक व आर्थिक साह्य देऊं केलें आहे. त्यामुळें पाकिस्तान सरकारची भूमिका थोडी ताठर झालेली आहे. गेल्या कांहीं महिन्यांत रशिआनें सीलोनला व भारताला तेल पुरवण्यासंबंधी करार केले आहेतच. आतां पाकिस्तानलाहि तेलाचा पुरवठा करण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. रशिआचें तेल स्वीकारण्याची तयारी पाकनें दाखविली तर तेलपुरवठ्याच्या अर्थव्यवस्थेंत आणखी एक मोठी घडामोड होणार आहे. कारण तेलाचा पुरवठा करण्याची युरोपीय कंपन्यांची मक्तेदारी त्यामुळें कमकुवत होणार आहे. पाकिस्तानचे संबंधित खात्याचे मंत्री लवकरच मॉस्कोला जाणार आहेत. पाकिस्तानांतील खनिज तेलाचा शोध लावण्यासाठी रशिआशीं करावयाच्या मदतीच्या कराराचा तपशील ते ठरविणार असल्याची वार्ता आहे. रशिआनें ह्यासंबंधीं भारताबरोबर जो करार केला आहे तसाच करार पाकिस्तानशीं होण्याचा संभव आहे.

---

## मोटारींच्या टायर्स तयार करण्याची यंत्रसामग्री

गुडइअर टायर फॅक्टरीनें दिल्लीपासून २१ मैलांवर मोटारींचे टायर्स तयार करण्याचा एक कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठी सुमारें ६ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्याचा पायाभरणी समारंभ मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांच्या हस्तें झाला. ह्याप्रसंगीं भाषण करतांना श्री. शहा म्हणाले कीं मोटारींना लागणारे टायर्स तयार करणाऱ्या कंपन्यांनीं एकत्र यावें आणि अशा कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री तयार करण्याचा एक कारखाना उभारावा. भारतामधील अर्थव्यवस्थेचा झपाट्यानें विकास होत आहे. आतां लवकरच 'जनता मोटारगाड्या' भारतांत तयार होऊं लागतील. हिंदुस्थानांत उत्तरोत्तर मोटारींना लागणाऱ्या टायर्सची मागणी अनेक पटींनीं वाढत जाणार आहे. तेव्हां टायर्स तयार करणारे आणखी किती तरी कारखाने उभारावे लागतील. ही यंत्रसामग्री सर्वच्या सर्व आयात करणें ही गोष्ट भारताला परवडण्यासारखी नाहीं. अर्थातच ही यंत्रसामग्री तयार करणारा कारखाना देशांतच उभारला गेला पाहिजे. तसें झाल्यानें बऱ्याच मोठ्या रकमेच्या परदेशीय चलनाची बचत होईल. प्रत्येक उद्योगधंद्यानें आपणास लागणारें परदेशीय चलन अंशतः तरी स्वतःच मिळविलें तर सरकारला तें हवें आहे. ह्या दृष्टीनें टायर्स व ट्यूब्स तयार करणाऱ्या कंपन्यांनीं आपल्या उत्पादनापैकी कांहीं हिस्सा परदेशांत निर्यात करावा. म्हणजे त्यांना लागणारा कच्चा माल परदेशांतून आयात करणें सुलभ होईल.

---

## तंबाकूपासून परकीय चलनाची प्राप्ति

तंबाकूच्या उत्पादकांस तंबाकूपासून प्रतिवर्षी सुमारें ४९ कोटी रुपयांचें उत्पन्न होतें तर देशास त्यापासून प्रतिवर्षी १५ कोटी रुपयांचें परकीय चलन मिळतें. या महत्त्वाच्या व्यापारी पिकाच्या निर्यातींत सतत वाढ होत असून, १९५७ ला संपलेल्या ५ वर्षांच्या कालावधींत भारतानें दरवर्षी सरासरी ८·५ कोटी रत्तल कच्च्या तंबाकूची निर्यात केली. युद्धपूर्वकालांतील निर्यातीच्या आंकड्यांपेक्षा हा आंकडा जवळजवळ दुप्पट आहे. तंबाकूच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी त्याची आयात करणाऱ्या देशांस कोणत्या प्रकारच्या तंबाकूची गरज आहे त्यासंबंधींची निश्चित माहिती देणारें एक प्रकाशन मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याच्या बाजारपेठ आणि तपासणी विभागानें प्रसिद्ध केलें आहे.

---

## तिसऱ्या योजनेच्या काळांत सहकारी चळवळीचा विकास

### ८० कोटी रु. खर्चाची तरतूद

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सहकारी पद्धतीच्या विकासासाठी सुमारें ८० कोटी रु. खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. तिसऱ्या योजनेच्या काळांत देशांत एकूण सुमारें ३०,५०० नव्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. त्याखेरीज चालू असलेल्या ५३,७०० सहकारी संस्थांची पुनर्रचना करून आणि अधिक बळकट करून सेवा सहकारी संस्थामध्यें त्यांचें रूपांतर करण्यांत येणार आहे तें वेगळेंच. नव्यानें स्थापन करण्यांत येणाऱ्या व बळकट करण्यांत येणाऱ्या सहकारी संस्थांना व्यवस्थापन कार्यासाठी सुरुवातीला आर्थिक साह्य देण्यांत येईल.

ग्रामीण सहकारी संस्थांची सदस्य संख्या दुसऱ्या योजनेच्या अखेरीस १.९ कोटीवर जाईल अशी अपेक्षा आहे. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस ती ३.९३ कोटींवर जाईल. सहकारी संस्थांच्या सदस्यांना १९६५–६६ मध्यें अल्प आणि दीर्घ मुदतीचे मिळून ५०० हून अधिक कोटी रु. कर्ज मिळण्याची सोय उपलब्ध होईल. १९६०–६१ मध्यें हा आंकडा १९० कोटीवर जाईल असा अंदाज आहे.

कर्जविकासाचा हा कार्यक्रम पार पाडतां यावा म्हणून सर्व पातळीवरील सहकारी संस्थांच्या पतपेढ्यांच्या भाग भांडवलांत व ठेवींत वाढ करावयाची आहे.

केंद्र व मध्यवर्ती बँका आर्थिक व संघटनात्मक दृष्टीनें भक्कम करण्यांत येतील व मध्यवर्ती बँका प्रमुख बाजारकेंद्रांचे ठिकाणीं अधिक शाखा उघडतील. कर्ज देणें, तें वसूल करणें व बँकेंत अधिक ठेवी ठेवणें यांकडे लक्ष वळवावें हा यामागें हेतु आहे.

जमीनसुधारणा आणि शेतकीकामास लागणारी यंत्रसामग्रीची खरेदी अधिक सुलभ व्हावी म्हणून प्रायमरी लॅण्ड मॉर्गेज बँका स्थापन करण्यांत येतील. दुसऱ्या योजनेच्या अखेरीस शेतकऱ्यांच्या अंगावर दीर्घ मुदतीच्या कर्जापैकीं ३३ कोटी रु. राहतील तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस हा आंकडा १५६ कोटी रु. वर जातील.

### बाजारपेठ

बाजारपेठेचा विचार करतां, ६४० नव्या खरेदी–विक्री सहकारी संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. हा आंकडा जमेस धरतां तिसऱ्या योजनेच्या अखेरीस अशा सहकारी संस्थांची संख्या २,५०० वर जाईल.

मालाला बाजारपेठ मिळवून देणें आणि उत्पादनाला आवश्यक असलेलें साहित्य पुरविणें सुलभ व्हावें म्हणून सहकारी संस्थांच्या मार्फत प्रमुख बाजारपेठांच्या ठिकाणीं ९२० जादा गुदामें आणि ग्रामीण विभागांत ९,००० गुदामें बांधण्यांत येणार आहेत. तसेंच शेतकी मालावर प्रक्रिया करण्याच्या पद्धतीला असलेलें महत्त्व लक्षांत घेऊन जादा ८६० प्रक्रिया केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत.

देशांत तयार होणाऱ्या दाणेदार साखरेच्या उत्पादनापैकीं २५ टक्के साखर तिसऱ्या योजनेच्या अखेरीस सहकारी कारखान्यांतच तयार होऊं लागेल. राष्ट्रीय विकास मंडळाच्या शिफारशीनुसार सहकारी संयुक्त शेतीपद्धतीच्या ३२० प्रायोगिक योजना सुरू करण्यांत येतील. यांपैकी प्रत्येक योजनेंत १० सहकारी संस्था असतील.

## कंपनी कायद्याखालील गुन्हे

### तक्रार करण्याचा अधिकार जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारला आहे काय?

भारत आयुर्वेदिक वर्कस् या कंपनीचा डायरेक्टर गोपाळ पिल्ले आणि इतर डायरेक्टर यांनीं खोटे बॅलन्सशीट प्रसिद्ध केले अशी तक्रार जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारनें केल्यावरून गोपाळ पिल्ले आणि इतर डायरेक्टर यांच्या विरुद्ध कंपन्यांचा कायदा (१९१३) या कायद्याच्या क. २८२ खालीं खटला भरण्यांत येऊन क. २८२ खालील गुन्ह्यासंबंधीं त्यांचेवर आरोप ठेवण्यांत आला. खटला ज्या मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत भरण्यांत आला त्या मॅजिस्ट्रेटपुढें गोपाळ पिल्लेचें म्हणणें असें होतें कीं, कंपन्यांच्या कायद्याखालील गुन्ह्यासंबंधीं तक्रार करण्याचा अधिकार कंपन्याच्या कायद्याच्या (१९१३) क. १४१ अ खालीं फक्त ॲड्व्होकेट जनरल अथवा पब्लिक प्रॉसिक्यूटर यांनाच असून तो अधिकार जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारला नाहीं. मॅजिस्ट्रेटनें हें म्हणणें मान्य न करतां वरीलप्रमाणें आरोप ठेवला. यावर गोपाळ पिल्लेनें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे रिव्हिजन-अर्ज केला. परंतु डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें ढवळाढवळ करण्याचें नाकारल्यामुळें गोपाळ पिल्लेने हायकोर्टांत रिव्हिजन अर्ज केला.

हायकोर्टापुढें निकालाकरितां एकच प्रश्न होता. तो असा कीं, कंपन्यांच्या कायद्याच्या (१९१३) क. १४१ अ खालीं जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारला कंपन्यांच्या कायद्याखालील गुन्ह्यांसंबंधीं तक्रार करण्याचा अधिकार आहे काय? कलम १४१ अ चा आशय पुढीलप्रमाणें आहे—

"१४१-अ. (१) कलम १३८ खालीं केलेल्या रिपोर्टावरून जर मध्यवर्ती सरकारला दिसून आलें कीं, ज्याच्याबद्दल फौजदारी खटला भरतां येईल असा कंपन्यांच्या कायद्याखालील गुन्हा एखाद्या इसमानें केला आहे तर मध्यवर्ती सरकार तें प्रकरण ॲड्व्होकेट जनरल अथवा पब्लिक प्रॉसिक्यूटर यांचेकडे सोंपवील.

(२) ज्यांच्याकडे वरील प्रकरण सोंपविलें आहे त्या अधिकाऱ्याला जर वाटलें कीं, मामला खटला भरण्यासारखा आहे तर तो अधिकारी त्या इसमावर खटला भरूं शकेल आणि त्या खटल्यांत त्या अधिकाऱ्याला सर्वतोपरी मदत करण्याचें कंपनीच्या सर्व अधिकाऱ्यांचें कर्तव्य राहील."

या कलमाचा आधार घेऊन गोपाळ पिल्लेतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, क. १४१ अ (१) खालीं ज्यांचा उल्लेख आहे अशाच अधिकाऱ्यांना तक्रार करण्याचा अधिकार आहे.

हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला नाहीं. कलम १४१-अ (१) मध्यें उल्लेख असलेल्या अधिकाऱ्यांखेरीज इतर अधिकाऱ्यांना कंपन्यांच्या कायद्याखालील गुन्ह्यांसंबंधीं तक्रार करण्याचा अधिकार नाहीं असें क. १४१-अ मध्यें कोठेंच म्हटलेलें नाहीं. असें असल्यामुळें कंपन्यांच्या कायद्याखालील गुन्ह्यांसंबंधीं तक्रार करण्याचा जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारला अधिकार आहे. त्या तक्रारीवर भरण्यांत आलेला प्रस्तुत मामल्यांतील खटला चालविण्याचा मॅजिस्ट्रेटला अधिकार आहे असा निकाल देऊन हायकोर्टानें गोपाळ पिल्लेचा रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला.

"कंपन्यांच्या कायद्याखालील गुन्ह्यांसंबंधीं, उदाहरणार्थ खोटे बॅलन्स शीट प्रसिद्ध करण्याबद्दल डायरेक्टरांविरुद्ध खटला भरण्यांत यावा अशी तक्रार करण्याचा अधिकार फक्त ॲड्व्होकेट जनरल अथवा पब्लिक प्रॉसिक्यूटर यांनाच आहे असें नसून जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारलाहि तो अधिकार आहे." असा ह्या निवाड्याचा सारांश आहे.

—केरळ हायकोर्टाचा निवाडा. न्यायबोध, नोव्हेंबर, १९६०.

## नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज स्थापनेची पूर्वतयारी झाली

दि नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज या संस्थेच्या स्थापनेची पूर्वतयारी झाली असून लवकरच ती नोंदली जाईल. देशांतील २४ सहकारी साखर कारखान्यांनीं मिळून ही संस्था स्थापन केली असून, या २४ कारखान्यांत सध्यां २·८६ लाख टन साखरेचें उत्पादन होत असतें. साखरेचें सबंध देशांतील अंदाजीं उत्पादन २४·२ लाख टन आहे. ही संस्था देशांतील सहकारी साखर कारखान्यांच्या कामकाजांत एकसूत्रता आणून नवीन सहकारी कारखाने काढण्यास मदत करील. एप्रिल, १९६१ च्या बेतास आणखी ७ सहकारी साखर कारखाने सुरू होणार असून, सहकारी तत्त्वावर साखर उत्पादन सुमारें ४ लाख टनांनीं वाढेल. या नॅशनल फेडरेशनच्या घटनेंत घटक कारखान्यांस समतोल व समप्रमाणांत प्रतिनिधित्व मिळण्याची तरतूद करण्यांत आली आहे. पांच किंवा त्याहून जास्त सहकारी कारखाने असलेल्या राज्यांत स्थापन करण्यांत यावयाच्या राज्य फेडरेशनास, अनेक लहान साखर कारखाने असलेल्या एकाहून जास्त राज्यांच्या विभागीय फेडरेशनांस आणि राज्य व विभागीय फेडरेशनें नसलेल्या विभागांतील सहकारी साखर कारखान्यांस या संस्थेचे सदस्य होतां येते. नॅशनल फेडरेशन आपल्या सदस्यांकडून वार्षिक वर्गणी घेऊन, प्रामुख्यानें आपलें पाठबळ उभारील.

## सहकार शिक्षणविषयक व्यवस्थेची पाहणी

मध्यवर्ती समाज विकास व सहकार खात्याचे संसदीय चिटणीस श्री. एस्. डी. मिश्रा यांच्या नेतृत्वाखालीं भारत सरकारनें एका सहकार शिक्षणविषयक अभ्यास तुकडीची स्थापना केली आहे. या तुकडींत एकूण १० सदस्य आहेत. सहकारविषयक शिक्षण देण्याची सध्यांची व्यवस्था पुरेशी आहे वा नाहीं या प्रश्नाची चौकशी करून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकार विकासाच्या गरजांनुसार एक शिक्षण कार्यक्रम आंखण्यासाठी शिफारशी करणें ही सदर अभ्यास तुकडीपुढील कामगिरी आहे. सहकारी चळवळीं-बद्दल आस्था असलेल्या बिनसरकारी व्यक्तींचें प्रत्यक्ष सहकार्य मिळविण्यासाठी ही तुकडी उपाय सुचवील; त्याचप्रमाणें शिक्षण-कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व त्यांत एक-सूत्रता आणण्याकरितां आवश्यक त्या कारभारात्मक व्यवस्थेची शिफारसहि करील. त्याचप्रमाणें ही तुकडी शिक्षण केंद्रावर व विद्यापीठांतून करतां येण्यासारख्या संशोधनकार्यासंबंधींहि शिफारशी करून शिक्षणकार्यक्रमाच्या इतर बाबींचाहि परामर्ष घेईल. ही तुकडी स्थापन झाल्यापासून तीन महिन्यांत आपला अहवाल सादर करील. सदर तुकडीची मुख्य कचेरी दिल्ली येथें राहील.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.


★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

किर्लोस्कर

•"कॉटेज" हॅन्ड शेंगायंत्र
•"कल्याण" हॅन्ड व पॉवर शेंगायंत्र
•"कल्याण" पॉवर शेंगायंत्र

शेंगा यंत्रें

बी-बियाणासाठीं, मोठ्या प्रमाणावर शेंग फोडण्यासाठीं अथवा तेल गिरण्यासाठीं या यंत्राचा उपयोग होतो. आपल्या उद्योगासाठीं योग्य अशा यंत्राची निवड करा व आपल्या मिळकतीत वाढ करा. यंत्राचे सुटे भाग नाबडतोब मिळू शकतात.



किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्करवाडी द. सातारा

## महाराष्ट्रांत नवे रेल्वे मार्ग होणार नाहींत

महाराष्ट्र सरकारनें सुचविलेल्या तेरा नव्या मार्गापैकीं एकाहि रेल्वेमार्गाला हिंदी रेल्वेजच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जागा मिळालेली नाहीं.

## कामगारांच्या नुकसानभरपाईत वाढ

वर्कर्स कॉंपेन्सेशन ॲक्टाखालीं देण्यांत येणारी नुकसानभरपाई वाढविण्यांत येणार आहे; त्यासाठीं कायद्यांत दुरुस्ती केली जाईल. मृत्यु आणि कायमचें पंगुत्व ह्यांसाठीं द्यावयाची नुकसानभरपाई दुप्पट करण्यांत येईल आणि रक्कम एकदम न देतां हप्त्यांनीं दिली जाईल. तात्कालिक पंगुत्वाची नुकसानभरपाई २५% नीं वाढविली जाईल. नुकसानभरपाईच्या पात्रतेसाठीं दरमहा ४०० रु. पगाराऐवजीं ५०० रु. पगार विचारांत घेतला जाईल.

## इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट

परदेशीं जाणाऱ्या प्रत्येकाला सध्यां इन्कमटॅक्स भरल्याचें किंवा माफीचें सर्टिफिकेट दाखल करावें लागतें. ज्याचे बाबतींत तो भारताला परत येणार नाहीं अशी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना शंका वाटते, अशांनाच असें सर्टिफिकेट ह्यापुढें आवश्यक होईल. अशांची यादी इन्कमटॅक्स खातें तयार ठेवील.

## मिसेस केनेडीची सोशल सेक्रेटरी

अमेरिकेच्या आगामी अध्यक्षांच्या पत्नी, मिसेस जॅकेलाइन केनेडी, ह्यांनीं आपल्या एका वर्गमैत्रिणीची सोशल सेक्रेटरी म्हणून नेमणूक केली आहे. जिनीव्हा विद्यापीठांत ती मानसशास्त्र शिकलेली असून तिला फ्रेंच व इटालियन उत्कृष्ट बोलतां येतें.

## पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था

पाकिस्तान आणि युनायटेड नेशन्स ह्यांचेमध्यें दि. १७ रोजीं एक करार झाला. त्याअन्वयें, पाकिस्तानांतील तरुण अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठीं युनायटेड नेशन्स तज्ज्ञ पुरविणार आहे. हे तज्ज्ञ पाकिस्तान सरकारच्या नियंत्रणाखालीं राहातील व त्यांचा खर्च पाकिस्तान सरकार देईल. कांहीं बाबतींत त्यांना विशेष सवलती मिळतील.

## महाराष्ट्र बँकेचे मॅनेजर श्री. जोग जनरल मॅनेजर झाले

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग ह्यांना बँकेचे जनरल मॅनेजर येत्या पांच वर्षांसाठीं नेमण्यांत आलें आहे.

## क्युबाची जागतिक बँकेंतून निवृत्ति

क्युबानें जागतिक बँकेच्या सभासदत्त्वाचा राजिनामा दिला आहे; तसें लेखी पत्र जागतिक बँकेकडे पाठविण्यांत आलें आहे.

## म्हसूर किर्लोस्कर लि.

वरील कंपनीला ३० जून, १९६० रोजीं संपलेल्या वर्षी १२·६३ लक्ष रु. नफा झाला; गेल्या वर्षी तो ६·७४ लक्ष रु. होता. १२% डिव्हिडंड गेल्या वर्षी दिलें होतें, तेंच आतां कायम ठेवण्यांत आलें आहे.

## लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनचें बोनस

लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनकडून १९६१ च्या मध्यास बोनस जाहीर करण्यांत येईल.

## बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स

### प्रमाणपत्र वितरण समारंभ

" तुमच्या कामावरच बँकांची भरभराट अवलंबून आहे, म्हणून तुम्हीं प्रामाणिकपणानें व सचोटीनें वागलें पाहिजे. तसेंच बँकेंत येणाऱ्या ग्राहकांस उत्तम मार्गदर्शन करून व सहकार्य देऊन त्यांचा विश्वास संपादन करा म्हणजे तुम्हीं जेथें जेथें काम कराल तेथील अपेक्षा पुऱ्या कराल" अशा आशयाचे उद्गार येथील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सतर्फे गेले तीन महिने चालू असलेला " बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स " यशस्वी रीतीनें पूर्ण केलेल्यांना प्रमाणपत्रें देण्याच्या समारंभ प्रसंगीं डेक्कन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. के. पां. जोशी, यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत काढले. समारंभाचे सुरुवातीस या कोर्सचे प्रमुख श्री. नि. ना. क्षीरसागर यांनीं स्वागतपर भाषण करून अध्यक्षांचा परिचय करून दिला. नंतर श्री. अ. ग. भोपटकर यांनीं कोर्ससंबंधींचा अहवाल वाचला. कोर्समध्यें यशस्वी झालेले दोन विद्यार्थी, श्री. गोडबोले व श्री. पांगारकर, यांनींहि भाषणें केलीं. त्यानंतर संस्थेचे संस्थापक, प्राध्यापक नानासाहेब भोपटकर यांनीं भाषण करून यशस्वी विद्यार्थ्यांस आशीर्वाद दिल्यावर अध्यक्षांचे हस्तें यशस्वी विद्यार्थ्यांस प्रमाणपत्रें वांटण्यांत आलीं. शेवटीं संस्थेचे कार्यवाह श्री. शं. ह. धुपकर यांनीं आभार मानले.

## बँक ऑफ कोल्हापूरच्या ठेवीदारांनीं केलेला अर्ज

लिक्विडेशनमध्यें आलेल्या बँक ऑफ कोल्हापूरच्या ठेवीदारांनीं लिक्विडेशनचें काम झपाट्यानें उरकण्यांत यावें असा एक विनंति-अर्ज गेल्या ऑगस्टमध्यें सरकारकडे केला होता. रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें या विनंतिअर्जावर विचार करण्यांत आला असून महाराष्ट्र हायकोर्टाचे कोर्ट लिक्विडेटर या बाबतींत शक्य ते उपाय योजीत असल्यानें या क्षणीं त्यासाठीं मध्यवर्ती सरकारला कांहीं खास उपाय योजण्याची आवश्यकता दिसत नाहीं.

## अमेरिका परदेशांतील खर्च कमी करणार

परदेशांतील अमेरिकन सैनिकांच्या कुटुंबियांपैकीं २,८४,००० जणांना अमेरिकेस परतण्याचा आदेश प्रेसिडेंट आयसेनहोअरनें दिला आहे. जानेवारी, १९६१ पासून दरमहा १,५०० प्रमाणें ते परत जातील. ह्या हुकुमामुळें, प. जर्मनीला दरसाल मिळणारें डॉलर्स बऱ्याच अंशीं कमी होतील; तेथें दरवर्षी ३·३ कोटी डॉलर्सची तेथील सैनिकांच्या पत्नी व मुलें ह्यांचेसाठीं आयात होत असते. परदेशांतील अमेरिकन सैनिकांची संख्या मात्र कमी करण्यांत येणार नाहीं. अमेरिकन सोन्याची निर्गत कमी करण्याचा हा प्रयत्न आहे.

## " संततिनियमनाचे कामीं युनायटेड नेशन्सनें पुढाकार घ्यावा "

जगांतील १७३ सुप्रसिद्ध शास्त्रज्ञांनीं ( त्यांत नोबेल प्राईझ मिळविलेले ३९ जण आहेत. ) युनायटेड नेशन्सला एक निवेदन सादर केलें आहे, तें सेक्रेटरी जनरलच्या प्रत्यक्ष हातांत ब्रिटिश शास्त्रज्ञ सर ज्युलिअन हक्सले आणि अमेरिकन असोसिएशन ऑफ बर्थकंट्रोलचे चेअरमन मि. कॅस कॅनफील्ड ह्यांनीं दिलें. "आज जगांतील दोनतृतीयांश लोकसंख्या अपुऱ्या अन्नावर जगत आहे; ह्या अर्धपोटीं लोकांत दररोज १,४०,००० जणांची भर पडत आहे. ह्या गतीनें, एका पिढींत, जगाची लोकसंख्या दुप्पट होईल. लोकसंख्या आणि साधनसामग्री ह्यांचेमध्यें समतोलपणा तात्काळ घडवून आणला नाहीं, तर दारिद्र्य, दुष्काळ, अज्ञान आणि असंतोष ह्यांचे तावडींत जग सांपडून आपल्याजवळ नाहीं तें मिळविण्यासाठीं युद्धें अपरिहार्य होतील. " असा त्या निवेदनाचा सारांश आहे.

**कागदाच्या धंद्याला उत्तेजन मिळण्याची शक्यता**

संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेतर्फे टोकिओ येथें एक परिषद् भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत कागद तयार करण्यासाठी लागणारा लगदा अतिपूर्वेकडील देशांत तयार करणें कितपत शक्य आहे ह्यासंबंधी विचार करण्यांत आला. परिषदेंत झालेल्या कामकाजावरून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत व नंतरहि भारतांत कागदाचे कारखाने काढण्यासाठी मदत दिली जाण्याचा संभव आहे असें दिसून आलें. परिषदेंत जी माहिती जमा करण्यांत आली त्यावरून भारतांतच मिळूं शकणाऱ्या कच्च्या मालापासून कागदासाठी लागणारा लगदा आर्थिक दृष्ट्या परवडणाऱ्या खर्चांत उत्पन्न करतां येईल असें दिसून आलें. ह्या धंद्याच्या बाबतींत प्रगत असलेल्या बऱ्याच देशांकडून भारताला तांत्रिक व आर्थिक मदत देण्याची तयारीहि दाखविण्यांत आली. संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे ह्या बाबतींतील डायरेक्टर ह्यांनीं स्वतः कागदाच्या धंद्याबाबत संघटना भारताला मदत करण्यास तयार असल्याचें सूचित केलें. कागदाच्या उत्पादनाला सोयीच्या अशा ठिकाणांची एक पाहणी करण्यांत येण्याची शक्यता आहे. ह्या पाहाणीचा खर्च संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या खास निधींतून केला जाईल. पाहाणीमुळें धंद्याची वाढ करण्यास खाजगी भांडवलदार पुढें येतील अशी अपेक्षा आहे. त्याशिवाय जलद वाढणाऱ्या झाडांची लागवड करण्याची एक योजना सुचविण्यांत येणार आहे. परिषदेच्या एका तज्ज्ञानें कागदाच्या धंद्याबद्दल तपशीलवार अहवाल तयार केला असून तो भारत सरकारकडे पाठविण्यांत आला आहे.

---

**भिल्ल जमातीच्या कल्याणाची योजना**

गुजरातमधील खेडब्रह्म तालुक्यांत भिल्ल लोकांची वस्ती आहे. ह्या लोकांचा विकास करण्यासाठी एक योजना १९५६ सालीं चालू करण्यांत आली होती. योजनेनें आजपर्यंत केलेल्या कार्याचें मूल्यमापन करण्यासाठी महादेवभाई देसाई समाजसेवा महाविद्यालयानें कांहीं संशोधकांची नियुक्ति केली होती. संशोधकांनीं आपला अहवाल आतां सादर केला आहे. अहवालांतील कांहीं माहिती पुढीलप्रमाणें आहे. भिल्ल समाजाच्या विकासाच्या ह्या योजनेसाठी २७ लाख रुपये मंजूर करण्यांत आले होते. मुख्यतः भिल्ल वस्ती असलेल्या ९७ खेड्यांचा योजनेंत अंतर्भाव करण्यांत आला होता. खेड्यांची एकूण लोकसंख्या सुमारें ३०,००० होती. २५ खेड्यांतील ४५९ भिल्ल कुटुंबांचा पहाणीसाठी उपयोग करण्यांत आला. पहाणींत असें दिसून आलें कीं दोन वर्षांच्या कालांत भिल्ल लोकांचें दरडोई उत्पन्न ४४ टक्क्यांनीं वाढलें. उत्पन्नाची वाढ होण्यास शेतीच्या नवीन पद्धती, कापसाची नव्यानें लागवड, एकूण लागवडीखालीं असलेल्या जमिनींत झालेली ५३ टक्के वाढ, चांगल्या बियाणांचा व खताचा पुरवठा, इत्यादींची मदत झालेली आहे. शेतीच्या एकूण उत्पादनांत १२ टक्के वाढ झालेली आहे. वाढ झालेल्या पिकांत गहू, तांदूळ, मका व कापूस ह्यांचा समावेश आहे. सहकारी संस्थांची वाढ ९० टक्क्यांनीं झाली व सावकारापासून कर्ज घेण्यापेक्षा सहकारी संस्थेकडून कर्ज घेण्याची प्रवृत्ति वाढत असल्याचें दिसून आलें. भिल्ल समाजांतील साक्षरतेचें प्रमाण १ टक्क्यापासून ७.९ टक्क्यांपर्यंत वाढलें. त्याचप्रमाणें प्रौढ शिक्षणाचा प्रसार सामाजिक बदलास उपकारक झाला.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**सोमनाथ देवळाची बांधणी**—सौराष्ट्रामधील इतिहासप्रसिद्ध सोमनाथ देवळाच्या जीर्णोद्धारासाठी आतांपर्यंत २५ लाख रुपयांची रक्कम खर्च झाली आहे. आतां हें काम अखेरच्या अवस्थेंत आहे. देवळाची उंची सर्वांत जास्त म्हणजे १५५ फूट होईल. देवळामधील मंडप व कलाकुसरीचीं इतर कामें ह्यासाठी आणखी २० लाख रुपयांची गरज आहे.

**फोर्ड फौंडेशनची देणगी**—अमेरिकेंतील विद्यापीठांतून भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची सोय करण्यासाठी फोर्ड फौंडेशननें १,६९,६४० डॉलर्सची देणगी जाहीर केली आहे. शिक्षकांना शिक्षण देण्यापासून ते भारतामधील अर्थव्यवस्थेच्या विकासाबाबत शिक्षण देण्यापर्यंत अनेक क्षेत्रांत ही मदत मिळणार आहे.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनची विनंती**—अहमदाबाद शहरांतील स्थावर मालमत्तेवर जो कर राज्यसरकारसाठी वसूल करण्यांत येतो तो सरकारनें कॉर्पोरेशनला द्यावा अशी विनंती अहमदाबाद कॉर्पोरेशननें एका ठरावानें सरकारला केली आहे. ही विनंति मान्य करण्यांत आली तर कॉर्पोरेशनचें उत्पन्न ३५ लाख रुपयांनीं वाढेल.

**कुटुंबनियोजनाचीं केंद्रें**—कराड तालुक्यांतील दोन गांवीं महाराष्ट्र सरकारनें कुटुंबनियोजनासाठी पुरुषांवर शस्त्रक्रिया करणारीं दोन केंद्रें उघडलीं आहेत. ह्या केंद्रांना लोकांकडून चांगली साद मिळत आहे. दोन्ही केंद्रांत मिळून आतांपर्यंत २०० पुरुषांनीं निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेतली आहे. ज्यांचें उत्पन्न दरमहा रु. १५० पेक्षा कमी असेल त्यांना सरकार २० रु. देत आहे.

**नव्या पुलाचें उद्घाटन**—बिहारमध्यें सोनेपूर व हाजीपूर ह्या स्टेशनांच्या दरम्यान नव्यानें बांधण्यांत आलेल्या रेल्वेच्या पुलाचें उद्घाटन बिहारचे मुख्यमंत्री डॉ. श्रीकृष्ण सिन्हा ह्यांनीं केलें. ईशान्य रेल्वेवरील ह्या पुलामुळें वाहतूक वाढण्यास मदत होणार आहे. पूल बांधण्यास ३ कोटी रु. खर्च आला. त्याला २५० फुटांच्या ८ कमानी आहेत.

**शेतकऱ्यांना शिक्षण**—मद्रास सरकारनें पुढील वर्षी शेतकऱ्यांना शिक्षण देण्यासाठी ६ केंद्रें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. शेतीच्या अगदीं आधुनिक पद्धतींचें शिक्षण देण्याची व्यवस्था तेथें करण्यांत येईल. शाळेंत प्रवेश देण्यांत येणारे विद्यार्थी प्रत्यक्ष शेती करीत असलेल्यांतून निवडले जाणार आहेत.

**गुजरातमधील साखर कारखाना**—राजकोटजवळ उभारण्यांत येत असलेला साखरेचा सहकारी कारखाना १९६१ च्या एप्रिल महिन्यापासून प्रयोग म्हणून सुरू करण्यांत येणार आहे. पुढील हंगामांत कारखान्यांत पूर्णांशानें उत्पादन होऊं लागेल. कारखान्यासाठी ५० लाख रु. भांडवल लागलें आहे.

**पाकिस्तानला भारताची मदत**—पूर्व बंगालमध्यें झालेल्या प्रचंड वादळांत हजारों लोक प्राणास मुकले आणि हजारों लोक बेकार झाले. ह्या निराश्रितांना मदत म्हणून भारत सरकारनें औषधें, तयार कपडे, इत्यादि २५,००० रुपये किंमतीचा माल पाठविला आहे. पडझड झालेलीं घरें पुन्हां उभारण्यासाठी १,००० टन वजनाचे लोखंडाचे पन्हाळी पत्रेहि धाडण्यांत आले आहेत.

**वाहतुकीच्या विमानांची खरेदी**—वाहतुकीला उपयोगी पडण्यासारखीं कांहीं विमानें रशिआकडून विकत घेण्याच्या हेतूनें भारताचें एक प्रतिनिधी मंडळ मॉस्कोला गेलें होतें. मंडळानें ह्या बाबतींत करार केल्याची वार्ता आहे. विमानें लष्कराच्या वाहतूक खात्यातर्फे वापरलीं जातील. भारताच्या उत्तर सरहद्दीवर रस्ते करण्यासाठी लागणारें साहित्य विमानें नेतील.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शे. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेडयूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. ११,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा..

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५१ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर



## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५८७४-७५

पोस्ट बॉक्स नं. ७७२
तारेचा पत्ता—फार्मबँक

मुख्य कचेरी— ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १९ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका २०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीसाठीं चौकशी करावी.

वि. द. दाते,
कार्यकारी संचालक.



स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

३१ डिसेंबर, १९५६

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७१,००० |
| ठेवी | रु. | १,८८,५२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,१५,००० |

मुदत ठेवीवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.